# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk16@dte.org.in Website:www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश

क्रमांक : १६/आस्था/मोटारकार/२०१७-१८/५२४
दिनांक : 28 MAR 2018

पहा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०११/प्र.क्र.५७/२०११/विनियम, दिनांक १७.०२.२०१२.
२) शासन ज्ञापन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.५९/साशि-१, दिनांक २३/३/२०१८

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेल्या या कार्यालयाच्या अधिनस्त संस्था / कार्यालयामधील अधिकाऱ्यांना नवीन / जुनी मोटारकार खरेदी करण्यासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सदर अग्रिम उपरोक्त क्रमांक १ मधील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून व संदर्भ क्रमांक २ नुसार शासनाने उपलब्ध केलेल्या निधीतून मोटारकार अग्रिम मंजूर करीत आहेत. त्यांना खालील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१. सदर अग्रिमावर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने व्याज आकारण्यांत यावे.

२. नवीन / जुनी मोटारकार खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यांत आलेल्या अग्रिमाची वसूली मोटारकार ज्या महिन्यात खरेदी केली असेल त्या लगतच्या महिन्यापासून करण्यांत यावी. सदर वसूली करतांना संदर्भित क्र.१ च्या शासन निर्णयामध्ये नमूद नियमानुसार करावी. मात्र एखादा अधिकारी नियत वयोमानानुसार उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद मासिक हप्ते पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपुर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल अशाप्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यांत यावेत.

३. वर मंजूर करण्यांत आलेली रक्कम सदर अधिकाऱ्यांनी वित्तीय प्रकाशन १९५९ मधील (नमुना क्रमांक २०) गहाणबंधपत्र (नमुना-२१. २१ ए) दुय्यम बंधपत्र (नमुना-२२) व प्रतीभूती बंधपत्र (नमुना-२२ ए) मध्ये करारपत्र सादर केल्यानंतर त्यांना रक्कम अदा करण्यांत यावी.

४. मोटारकार अग्रिम मिळाल्यानंतर एक महिन्यात नवीन मोटारकार खरेदी करण्यांत आली नाही तर संपूर्ण रक्कम एक रकमी परत करण्यांत यावी, जर तसे एक महिन्यात केले नसल्यास दंडनीय व्याज आकारण्यांत यावे व मुंबई वित्तीय नियमावली १९५९ मधील १२४ (ब) च्या तरतूदीनुसार अग्रिमाचे शिल्लक राहिलेले हप्ते किंवा मुद्दल रक्कम आणि व्याज या रकमांवर दंडनीय चक्रवाढ व्याज आकारण्यांत यावे.

५. नवीन मोटारकार अग्रिम मंजुरीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत मान्यताप्राप्त विक्रेत्याकडून खरेदी करावी व तसे कागदपत्र शासनास सादर करावेत. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम एक महिन्यानंतर दंडनीय व्याजासह वसूल करण्यांत यावी.

६. मोटारकार अग्रिमाची व्याजासह परतफेड होईपर्यंत मोटारकार शासनाकडे गहाण राहील. त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यास विहित नमुन्यात व कार्यपध्दतीप्रमाणे गहाणखत भरुन देणे आवश्यक राहील. तसेच असे गहाणखत वेळोवेळी भरुन देण्यापूर्वी सदर मोटारकार यांत्रिकीदृष्या सुदृढ आहे याची जबाबदारी अग्रिम घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची राहील. त्याचप्रमाणे जर एखाद्या प्रसंगी यांत्रिकीदृष्टया सुदृढ नसलेली मोटारकार शासनाकडे गहाण ठेवली गेल्यास व अशा मोटारकारच्या अग्रिमाच्या वसूलीसाठी लिलावाने विक्रि करावयाचा प्रसंग उद्भवल्यास अशा लिलावापासून येणाऱ्या रक्कमेपेक्षा शिल्लक राहणारी वसूलीपात्र रक्कम दंडनीय व्याजासह संबंधीत अधिकाऱ्यांच्या सेवा उपदान, गटविमा योजना, रजेचे रोखीकरण इत्यादी

अनुज्ञेय रक्कमांमधून किंवा त्यांना अथवा त्यांच्या वारसदारांना शासनाकडून देय असलेल्या अन्य रकमेतून वसूल करण्यांत यावी. तसेच मोटारकारचा स्वखर्चाने शासकीय विमा उतरविण्यांत यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

७. गहाणखतामध्ये मोटारकारचा मेक [MAKE] मॉडेल [MODEL] आणि चेसिस क्रमांक [CHASSIS NO.] स्पष्टपणे नमूद करण्यांत यावा.

८. संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यांत येते की, संबंधित अधिकाऱ्यांना नवीन मोटारकार खरेदीसाठी मंजूर केलेल्या अग्रिमाची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यांत यावी.

९. या आदेशानुसार अग्रिम मंजूर करण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांकडून मोटारकार खरेदी केल्यानंतर मोटारकार खरेदी केल्याच्या पावत्या, गहाणखताच्या प्रती, विमा हप्ता भरल्यांची प्रत, इत्यादी छायांकित प्रती सांक्षांकित करुन तीन महिन्याच्या आत या कार्यालयास सादर कराव्यात. तसे न केल्यास संबंधित संस्था / कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील.

१०. अग्रिम धनाची उचल करावयाची नसल्यास मुंबई वित्तीय नियम १३३ (चार) ला अनुसरुन तत्संबंधीची माहिती या कार्यालयास कळविण्यांत यावी. तसेच अग्रिम धनाची रक्कम मंजूर केलेल्या आदेशाचा क्रमांक, दिनांक, मंजूरीची रक्कम व प्रमाणक क्रमांक याबाबतचा तपशिल या संचालनालयास सादर करावा.

**या कारणासाठी होणारा खर्च "उच्च व तंत्रशिक्षण विभाग-मागणी क्रमांक डब्ल्यू-९--७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे-(००)२०२,(००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१० १५३ ९)"५५ आगाऊ रक्कम या शिर्षाखाली चालू वर्षी म्हणजेच सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानाप्रमाणे खर्ची टाकण्यांत यावा. सदर देयके लवकरात लवकर पारीत करुन घेण्यांत यावीत.**

( डॉ. अभय वाघ )
**संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, साकोली / ठाणे (मानार्थ) (संबंधित संस्थाप्रमुखांमार्फत)
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई /नागपूर त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी त्यांच्या विभागांतर्गत वाटप करण्यांत आलेले अनुदान खर्ची पडल्याबाबतची (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) एकत्रित माहिती या संचालनालयास तात्काळ पाठविण्यांत यावी.
३. प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन, साकोली / ठाणे, यांना कळविण्यात येते की, अनुदान खर्ची पडल्यानंतर लगेचच त्याबाबतचा तपशिल (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) संबंधित विभागीय कार्यालयास तात्काळ पाठविण्यांत यावा. तसेच संबंधित व्यक्तींच्या सेवापुस्तकात अग्रिम मंजुर झाल्याबाबतची नोंद घेण्यांत यावी व त्यांना या कार्यालयीन आदेशाची छायांकीत प्रत देण्यात यावी.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. संचालक, विमा संचालनालय, म्हाडा बिल्डिंग (गृहनिर्माण), पहिला मजला, खोली क्र.२६४, वांद्रे (पू), मुंबई ५१.
७. कार्यासन क्र. १५ मुख्य कार्यालय, मुंबई.
८. कार्यासन क्र. १६, मुख्य कार्यालय, मुंबई. (निवड नस्ती)

कार्यालयीन आदेश क्रमांक :१६/आस्था/मोटारकार/२०१७-१८/५२४, दिनांक : सोबतचे परिशिष्ठ

मोटारकार अग्रिम २०१७-१८ 28 MAR 2018

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | संस्था / कार्यालयाचे नांव | अग्रिम रक्कम(रुपये ) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. डी. एच. पाटील | अधि. रसायनशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, साकोली | ३,५०,०००/- |
| २ | श्री. पी. डब्ल्यू कतोरे | अधि. इंग्रजी | शासकीय तंत्रनिकेतन, साकोली | ३,५०,०००/- |
| ३ | श्रीमती सुनिता अविनाश थोरात | अधि. भौतिकशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे | ३,५०,०००/- |
| | | | (रुपये दहा लाख पन्नास हजार फक्त) रुपये | १०,५०,०००/- |

उपरोक्त परिशिष्ठास अनुसरुन संबंधित संस्था प्रमुखास पुढीलप्रमाणे अनुदान सुपूर्द करण्यांत येत आहे. त्यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे अग्रिमाची रक्कम संबंधित अधिकाऱ्यांना आपल्या स्तरावर प्रदान करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या संचालनालयास सादर करण्यांत यावा.

| मोटारकार अग्रिम संस्थानिहाय वाटप करण्यांत आलेले एकुण अनुदान ( सन २०१७-१८ ) | | |
|---|---|---|
| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नांव | अनुदान रक्कम |
| १. | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, साकोली | ७,००,०००/- |
| २. | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे | ३,५०,०००/- |
| | एकुण रक्कम रुपये | १०,५०,०००/- |
| (रुपये दहा लाख पन्नास हजार फक्त) | | |

( डॉ. अभय वाघ )
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.